लोकमत ५.५१.१

# अमली पदार्थाची खबर दिली म्हणून मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** अमली पदार्थ विकत असल्याची खबर पोलिसांना देतो, असे सांगत दोघांनी एकाला मारहाण केल्याची घटना भाईंदर येथे घडली.

बिल्ला शाकीर मिर्झा (३०) आणि मोबिन खान या दोघांनी प्रवीण कुशल शेट्टी (३०, रा.श्रीनाथ वंदना, गोल्डन नेस्ट फेस-१, भाईंदर पूर्व) यांना फोन करून शेट्टी यांना स्वागत बार येथे १८ एप्रिल रोजी बोलावले. मिर्झा व खान तेथे आले. आम्ही दोघे एमडी हा अमली पदार्थ विकतो ते तू पोलिसांना सांगितले, तसेच तुम्ही दोघांनी माझ्या भावालाही एमडीची नशा करायचे शिकविले, असे शेट्टी म्हणाले. मिर्झा व खान यांनी त्या गोष्टीचा मनात राग धरून तक्रारदार यांना ठोश्याबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळी व मारण्याची धमकी दिली. शेट्टी यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

# मुलीवर अत्याचार



**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाणे हद्दीत एक अनोळखी व्यक्ती एका ७ ते ८ वर्षाच्या चिमुरडीला घेऊन एका इमारतीत आला होता. तो तिच्यावर अत्याचार करत असताना त्याला कोणीतरी येण्याची चाहूल लागताच त्याने तिथून पळ काढला. महिलेच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी १९ एप्रिल रोजी अनोळखी व्यक्तीविरुद्ध पोक्सोनुसार गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नेवसे हे तपास करीत आहेत.

# एटीएम कार्ड बदलून फसवले

**नालासोपारा :** एटीएम कार्डची अदलाबदली करून तरुणाची फसवणूक करण्यात आल्याची घटना नालासोपारा येथे घडली आहे. संतोष भवनच्या ओम साई वेल्फेअर सोसायटीत राहणाऱ्या गणेश गौड (१८) हा गुरुवारी दुपारी बिलालपाडा येथील एसबीआय बँकेच्या एटीएममध्ये नवीन एटीएम पिन जनरेट करण्यासाठी गेला होता. यावेळी तेथे असलेल्या एका आरोपीने एटीएम पिन बघून त्यांच्या एटीएम कार्डची अदलाबदली करून त्यांच्या बँक खात्यातून ४० हजार रुपयांची रक्कम काढून त्यांची फसवणूक केली. शुक्रवारी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
CamScanner

लोकमत पु. पान क्र. ४

# एक किलो सोने खरेदीत ६३ लाखांचा गंडा

## भाईंदरच्या सराफाची फसवणूक; पुण्याच्या भामट्या दाम्पत्यावर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** भाईंदरच्या एका सराफाचा आधी विश्वास संपादन करून नंतर १ किलो सोन्याच्या चेन घेऊन त्याचे पैसे न देता ६३ लाख ४५ हजार रुपयांना गंडा घालणाऱ्या पुण्याच्या भामट्या दाम्पत्याविरुद्ध नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

नवघर मार्गावर दीपक किशनलाल जैन यांचे श्रीराम ज्वेलर्स नावाचे सराफा दुकान आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये जैन यांनी त्यांच्या फेसबुकवर सोन्याच्या चेन होलसेल भावात विक्रीसाठी उपलब्धबाबत जाहिरात केली होती. जाहिरातीच्या अनुषंगाने डिसेंबर २०२३ मध्ये विनोद कुलकर्णी याने विचारणा केली. त्याने स्वतःचे पुण्यात नेहरू चौक येथे लक्ष्मी ज्वेलर्स नावाने तसेच परिसरात ५ सराफा दुकाने असल्याचे सांगितले. ही दुकाने तो आणि पत्नी अश्विनी सांभाळत असल्याचे सांगितले.

### नंतर मोबाइलच बंद

- कुलकर्णी याने जैन यांच्या श्रीराम ज्वेलर्समधून पहिल्याच खेपेत १७ चेन होलसेल भावात खरेदी करून ५ लाख रोख दिले. त्यानंतरदेखील रोखीने पैसे देऊन कुलकर्णी हा दागिने खरेदी करून जात होता.
- **जानेवारी २०२४ मध्ये कुलकर्णी याने आपल्याला मोठी ऑर्डर मिळाल्याचे सांगून सोन्याच्या चेन बनवून पाहिजेत व त्याचे पैसे २-३ दिवसात देणार असे सांगितले.**
- आधीचे व्यवहार नीट असल्याने ३ फेब्रुवारी रोजी कुलकर्णी याने जैन यांच्या दुकानातून १ किलोच्या चेन खरेदी केल्या. त्याचे ६३ लाख ४५ हजार रुपयांचे बिल दिले. दोन ते तीन दिवसात पैसे देतो सांगून कुलकर्णी गेला. ७ फेब्रुवारी रोजी जैन यांनी फोन केला असता पैसे किंवा चेन परत करतो सांगितले. नंतर त्याचा मोबाइलच बंद आला.

### अनेकांची फसवणूक

- जैन यांनी पुण्यातील त्याचा चुलत भाऊ प्रियांक परमार याला कुलकर्णी याच्या लक्ष्मी ज्वेलर्स दुकानात पाठवले असता दुकानात त्याची पत्नी अश्विनी आणि कर्मचारी होते.
- **विनोद हा आंध्र प्रदेश येथे गेल्याने तो आल्यानंतर आठवडाभरात पैसे किंवा चेन परत देणार असे सांगितले. परंतु २१ फेब्रुवारी रोजी परमार हे पुन्हा कुलकर्णीच्या दुकानात गेले असता दुकान बंद होते आणि कुलकर्णीचा नंबरसुद्धा बंद होता.**
- परमार याने चौकशी केली असता विनोद आणि अश्विनी कुलकर्णी यांनी अनेकांना फसवले असून त्यांच्यावर गुन्हे दाखल असल्याचे समजले.
- **जैन यांच्या फिर्यादीवरून १८ एप्रिल रोजी नवघर पोलिसांनी विनोद आणि अश्विनी कुलकर्णी या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.**

# वृद्धाची लाखोंची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** आचोळे रोडवरील लीलावती नगर येथे राहणाऱ्या लुनकरनची मालू (७६) यांची सन २०१६ ते आजपर्यंत रूमच्या नावावर लाखोंची फसवणूक झाली आहे.

आरोपी विकासक वंदेश पुरव याने त्यांना स्वस्तात रूम देण्याचे व बांधकाम व्यवसायात रक्कम गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून आस्था समृद्धी बिल्डिंगमधील दोन रूमच्या व्यवहारापोटी त्यांच्याकडून १९ लाख ९५ हजार रुपये चेकद्वारे व रोख स्वरूपात घेतले. मात्र आजपर्यंत दोन्ही रूमचा ताबा न देता घेतलेली रक्कम परत केली नाही. त्यानंतर देखील त्या रूमच्या बदल्यात त्याच बिल्डिंगमधील रूम हा जयेश नाईकला यापूर्वीच ताब्यात दिल्याची माहिती दडवून ठेवली. ती रूम फिर्यादीला देण्याचे दाखवून तसा नोटरी करार देऊन अद्यापपर्यंत कोणताही रूमचा ताबा अथवा घेतलेली रक्कम परत न करता विश्वासघात करून फसवणूक केली आहे. नालासोपारा पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
CamScanner

लोकमत पु. पान क्र. ४

# महिला प्रवाशाच्या चेहऱ्यावर पेल्हार पोलिसांनी फुलवले हसू

## रिक्षात गहाळ झालेला लाखांचा मुद्देमाल मिळवून दिला परत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : रिक्षात प्रवासात गहाळ झालेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा लाखोंचा मुद्देमाल परत मिळवून देण्यात पेल्हारच्या पोलिसांना यश मिळाले आहे. गहाळ झालेला मुद्देमाल परत मिळाल्याने महिला प्रवाशाच्या चेहऱ्यावर हसू फुलले होते.

धानिवबाग येथे राहणाऱ्या नाजली अन्सारी (२४) या १७ एप्रिलला दुपारी नालासोपारा रेल्वेस्थानक येथे जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यांनी रिक्षा पकडली. रिक्षा प्रवासादरम्यान बॅग रिक्षात विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्या बॅगमध्ये १ तोळे सोन्याची चेन, २ ग्रॅमचे झुमके, ५ हजार रोख असे १ लाख ५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल गहाळ झाल्याचे लक्षात आले. त्यांनी पेल्हार पोलिसांना माहिती देऊन तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी अनोळखी रिक्षा व चालकाचा शोध घेण्यासाठी पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी गुन्हे प्रकटीकरणातील पोलिस अधिकारी, अंमलदारांना सूचना व आदेश दिला.



### सीसीटीव्हीची मदत

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता एका रिक्षामधून नाजली अन्सारी या उतरताना दिसल्या. त्या रिक्षाच्या सीसीटीव्हीच्या आधारे शोध घेतल्यावर ती रिक्षा सोपारा फाटा ते नालासोपारा रेल्वेस्थानक अशी प्रवासी वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली. रिक्षाचा शोध घेतल्यावर चालकाला बॅगबाबत विचारणा केल्यावर मौल्यवान वस्तू असलेली बॅग त्याने पोलिसांना आणून दिली. पेल्हार पोलिसांनी ऐवजासहित बॅग नाजली यांना परत केली.

### यांनी केली कामगिरी

ही कामगिरी पोलिस उपायुक्त जयंत बजबळे, सहायक पोलिस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलिस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, पोलिस निरीक्षक (प्रशासक) शकील शेख, गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि सोपान पाटील, पोलिस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, पोलिस हवालदार योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मीक पाटील, रवी वानखेडे, किरण आव्हाड, मिथुन मोहित आदींनी केली आहे.

# जन्नत हॉटेलवर नायगाव पोलिसांनी केली कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील ससुनपाडा गावाच्या हद्दीतील जन्नत हॉटेलवर गुरुवारी मध्यरात्री नायगाव पोलिसांनी कारवाई केली आहे. या हॉटेलमध्ये हुक्का बार चालवण्यासाठी मनाई असतानाही हुक्का बार सुरू होता. पोलिस अंमलदार सोमनाथ बोडके यांनी धाड मारून कारवाई केली आहे. पोलिसांनी २ हुक्का, पाइप, फ्लेव्हर असा एकूण १ हजार ८८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी मॅनेजर अश्रफ मंडल (५६), सागर केशरी (२४) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# कॉम्प्रेसर बिघाडाबाबत विचारताच चोपले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरारोडच्या काशीमीरा भागातील पोकार कॉम्प्लेक्समध्ये राहणारे मोहन अर्जुनराव पोळ (५४) यांनी आकीब खान (२७, रा. संस्कृती बिल्डिंग, बेव्हर्ली पार्क, मीरारोड पूर्व) यांच्याकडून कॉम्प्रेसर विकत घेतला होता. खरेदी केलेला कॉम्प्रेसर खराब झाल्याने त्याबाबत पोळ यांनी खान यांच्याकडे विचारणा केली असता खान व त्याच्या ३ साथीदारांनी मिळून पोळ यांना मारहाण करून शिवीगाळ केली तसेच दमदाटी केली. पोळ यांच्या फिर्यादीवरून मीरारोड पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

# मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : रविवारी २१ एप्रिलला महावीर जयंती असल्याने मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याबाबत मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने वसई-विरार शहरातील मांस विक्रीची दुकाने बंद ठेवून सहकार्य करावे, असे आवाहन वसई-विरार महापालिकेने केले आहे.

CS CamScanner

CS CamScanner

पुढारी पान क्र. ४

# नाला संवर्धनासाठी महिला छेडणार आंदोलन

## नालासोपारा समेळगावात नैसर्गिक नाला बुजवल्याने संताप

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा शहरातील उमराळे समेळपाडा, साईनगर परिसरातील सांडपाणी व पावसाचे पाणी वाहणारा ४० वर्षापासूनचा नैसर्गिक नाला बुजवण्यात आला आहे. नगर रचना विभाग यांच्याशी संगनमत करून त्याठिकाणी महाविद्यालय बांधण्याचे काम चालू आहे. समेळपाडा उमराळे येथील



रहिवासी भाग वाढत चाललेला आहे. ज्यांनी नाल्याच्या काठी जागा घेतल्या, त्यांनी आपल्या आवश्यकतेप्रमाणे जागा वाढवून नाल्याचे पाणी वळविले. काहींनी चक्क नालाच बुजवून आरसीसी पाईप टाकून त्याजागी बांधकाम केले आहे.

वास्तविक अंतिम लेआउट मंजूर करताना स्थळपाहणी करून मंजुरी देणे बंधनकारकआहे. महापालिकेच्या नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी न करता कार्यालयात बसूनच भूमाफियांना लेआउटला मंजुरी दिली आहे.

पावसाळ्यात उमराळे, समेळपाडा व साई नगर परिसरात जलकोंडीची भीती आहे.

## तडीपार सराईत गुन्हेगार जेरबंद

**पालघर :** ठाण्याच्या हद्दीतून हद्दपार केलेल्या सराईत गुन्हेगाराला अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांना यश आले आहे. आगामी लोकसभा निवडणूक शांततेत व सुरळीत पार पाडावी, या अनुषंगाने मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात फरारी आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. अर्नाळा पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात राहणारा सराईत आरोपी मुकेश उर्फ माका विनोद मांगेला (३१) याला परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त यांनी पालघर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे या जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रांच्या हद्दीतून दोन वर्षांकरिता हद्दपार केले होते. २० गंभीर गुन्हे दाखल आरोपी मुकेश याच्याविरोधात अर्नाळा पोलिस ठाण्यात मारामारी, दुखापत, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, जबरी चोरी असे २० पेक्षा जास्तव गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. गुरुवारी दुपारी आरोपीला ताब्यात घेतले. त्याने हद्दपार आदेशाचा भंग केल्याने अर्नाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळ यांच्य मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, उपनिरीक्षक उमेश भागवत, हवालदार अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, गणेश यादव व सायबर सेलचे संतोष चव्हाण यांनी पार पाडली आहे.

## दहा वर्षांच्या मुलाचे अपहरण

**पालघर :** एका दहा वर्षांच्या अल्पवयीन मुलाचे अपहरण झाल्याची घटना आचोळे पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. हा मुलगा पाचंबा परिसरात राहत होता. गुरुवारी हा मुलगा खेळण्यासाठी घराबाहेर पडला होता. त्यानंतर तो घरी परतलाच नाही. नातेवाईकांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता तो सापडला नसल्याने कोणीतरी आमिष दाखवून त्याला पळवून नेल्याची शक्यता लक्षात घेत मुलाच्या आईने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार अपहरणाचा गुन्हा दाखल आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**पालघर :** विरार पोलीस ठाणे क्षेत्रातील साईनाथ नगर भागात असलेल्या कामधेनू इमारतीमध्ये एका तेरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. आत्महत्येचे कारण अस्पष्ट आहे. गुरुवारी राहत्या घराच्या पंखाला ओढणीने गळफास घेत तिने ही आत्महत्या केली असून विरार पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner
CamScanner

पुढारी पान क्र. ३

## मुलीचा विनयभंग, बापाला अटक

**मिरारोड :** मिरारोड पोलीस ठाणे हद्दीत स्वतःच्या १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलीसोबत लैंगिक चाळे करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी मीरारोड पोलिसांनी त्या नराधम बापावर विनयभंगासह पोस्कोचा गुन्हा दाखल केला असून त्याला अटक केली आहे. मिरारोड भागात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला तिचा बाप ती घरात एकटी असल्याचे पाहून तिच्यासोबत अश्लील आणि लैंगिक चाळे करत होता. मार्च २०२२ पासून १६ एप्रिल २०२४ पर्यंत तिचा वासनांध बाप हा पोटच्या पोरीचे लैंगिक शोषण करत होता. हा प्रकार मुलीच्या आईच्या निदर्शनास आल्यानंतर या घृणास्पद कृत्याचा घडा फुटला. मुलीच्या आईनेच आपल्या पतीच्या विरोधात मीरारोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. प्रकरणाचे गांभीर्य पाहून १८ एप्रिल रोजी पोलिसांनी पोक्सो, विनयभंगाचा गुन्हा दाखल करून वासनांध बापाला बेड्या ठोकल्या आहेत.

पुण्यनगरी पृ.पा.क्र. १

# डेबिट, क्रेडिट कार्डाच्या गैरवापरातून एकास अटक

## आरोपीला हरयाणा येथून पोलिसांनी घेतले ताब्यात

**मीरा रोड :** भाईंदर पोलीस ठाण्यात डेबिड कार्ड व क्रेडिट कार्ड चोरून त्यातून चार लाख चार हजार रुपये काढले. चोरी व फसवणूकप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यात तांत्रिक तपास करून आरोपीला भाईंदर पोलीसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने हरयाणा येथून अटक करून चार गुन्हे उघडकीस आणले आहेत. तक्रारदार अमीत अग्रवाल (४४) हे ३१ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता राहत असलेल्या इंद्रप्रस्थ बिल्डिंगची मॅच असल्याने ते ब्लूवपिंच टर्फ, भाईंदर (प.) येथे क्रिकेटचे सामने खेळण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्याकडील बॅग कोणी तरी अज्ञात व्यक्तीने चोरी करून त्यातील डेबिट कार्ड व क्रेडिट कार्डवरून ४ लाख ४ हजार रुपयांचे ट्रान्झेक्शन केले होते. याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नंतर भाईंदर पोलिसांनी घटनास्थळाला भेट दिली आणि अंधेरी पूर्व येथील उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेराचे फुटेज तपासले. त्यात त्यांना एक संशयित व्यक्ती दिसला. घटनास्थळ व इतर ठिकाणचे तांत्रिक विश्लेषण करून त्याआधारे गुन्ह्याचा पुढील तपास केला. आरोपी फरीदाबाद (हरियाणा) येथील असल्याचे निष्पन्न झाले होते. आरोपी ट्विंकल अर्जुन अरोरा (३४, रा. बी/१६५, स्ट्रीट नं. २२, भिकम कॉलनी, ता. जि. फरिदाबाद, हरियाणा) असे असल्याचे उघड झाले. त्यानंतर त्याचा शोध घेतला. तो हाऊस नं. १४९५, सेक्टर ७३, हरियाणा येथे दिसल्याने त्यास ताब्यात घेतले. तपासात गुन्ह्यात सहभाग असल्याचे स्पष्ट झाले. त्याला १६ एप्रिल रोजी अटक करण्यात आली.



अटक आरोपीकडे पोलीस कोठडीदरम्यान तपास केला असता त्याने इतर पोलीस ठाणे हद्दीत तीन ठिकाणी चोरीचे फसवणुकीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. पोलीस कोठडीदरम्यान आरोपीचा पूर्वअभिलेख तपासला. त्यामुसार अटक आरोपीवर वसंत विहार पोलीस ठाणे, दिल्ली येथे तीन आणि बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे येथे एक गुन्हा नोंद असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

CamScanner
CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 27 अंक-302 मुंबई, रविवार 21 अप्रैल 2024 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# 1,05,000 रुपये के आभूषण और नकदी को पेल्हार पुलिस ने महिला शिकायतकर्ता को लौटाया

**वसई:** पेल्हार पुलिस स्टेशन की अपराध जांच टीम 1,05,000 रुपये के कीमती आभूषण और नकदी बरामद करने में सफल रही और इसे शिकायतकर्ता को लौटा दिया। हालाँकि, महिला ने उपरोक्त सामग्री पाने के बाद उसके चेहरों पर खुशी दौड़ पड़ी। फिलहाल, महिला ने पेल्हार पुलिस का आभार व्यक्त किया है। पुलिस ने कहा कि, 17 अप्रैल को दोपहर लगभग 02.00 बजे महिला नाजली अंजुम अबुसाद अंसारी उम्र 24 वर्ष, निवासी- नालासोपारा पूर्व, यह नालासोपारा रेलवे स्टेशन से धानिवबाग, नालासोपारा पूर्व तक यात्री रिक्शा में आई। घर जाने के बाद वह रिक्शे में अपना बैग भूल गयी, वह तत्काल पेल्हार पुलिस स्टेशन पहुँची और अपनी 1 तोले की सोने की चेन, 2 ग्राम वजन की सोने की बालियां और 5,000 रुपये नकद यानी महिला ने बेंग में 1,05,000 रुपये का सामान रिक्शा में भूल गयी। इस संबंध में पेल्हार थाने में महिला ने शिकायत दी। पुलिस ने कहा कि, उक्त शिकायत की गंभीरता को देखते हुए पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी ने अपराध जांच शाखा के अधिकारी



व कर्मचारी को उक्त शिकायत में अज्ञात रिक्शा और उसके चालक की तलाश करने का निर्देश दिया। उक्त आदेश के अनुसार जब अपराध जांच शाखा की टीम के अधिकारी व कर्मचारी ने घटना स्थल के सीसीटीवी फुटेज की जांच की तो शिकायतकर्ता महिला रिक्शे से उतरती हुई दिखाई दी. सीसीटीवी फुटेज के अनुसार जब उक्त रिक्शा की तलाश की गई तो जानकारी प्राप्त हुई कि उक्त रिक्शा नालासोपारा रेल्वे स्टेशन से सोपाराफाटा तक यात्रियों को ले जा रहा था, तदनुसार, जब उक्त रिक्शा की तलाशी ली गई तो पता चला कि उक्त रिक्शा एमएच 48 एएक्स 4241 है। जब उक्त रिक्शे के चालक से मामले के बारे में पूछा गया तो उसने उक्त महिला का कीमती सामान आभूषण पुलिस को सौंप दी। वहीं पुलिस ने शिकायतकर्ता महिला नाजली अंजुम अबुसाद अंसारी उम्र 24 वर्ष को उक्त बैंग और उसमें रखा कीमती सामान वापस कर दिया है।

CS CamScanner

दैनिक आमची मुंबई

ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.

वर्ष : ११ | अंक. १८ | रविवार २१ एप्रिल २०२४ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०४

# सीसीटीव्ही तपासून पेल्हार पोलिसांची कारवाई, 'हिट एण्ड रन'च्या आरोपीला पंजाब मधून अटक

**वसई.** मुंबई अहमदाबाद महामार्गावर एका पादचाऱ्याला धडक देऊन फरार झालेल्या ट्रकचालकास पेल्हार पोलिसांनी उत्तर प्रदेशातून अटक केली आहे. महामार्गावरील ६० हून अधिक सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस आला आहे. मंगळवार १६ एप्रिल रोजी मुंबई अहमदाबाद महामार्गावरील पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अज्ञात वाहनाने एका ३५ वर्षीय इसमाला धडक दिली होती. जखमी होऊन तो इसम रस्त्यावर पडला होता. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर




अज्ञात वाहनचालक फरार झाला होता. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरोदातत कलम ३०४ (अ), २७९, ३३७,३३८ अन्वये गुन्हा दाखल होता. मयताची ओळखही पटलेली नव्हती. मात्र आरोपीला पकडण्यासाठी पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी कंबर कसली. गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने फरार वाहनचालकाचा शोध सुरू केला. महामार्ग परिसरातील ६० ते ७० सीसीटीव्ही कॅमेरे पोलिसांनी तपासले. त्यावेळी एक ट्रक ठोकर मारून जाताना दिसला. त्या ट्रकच्या वर्णन आणि नंबर वरून पोलिसांनी माग सुरू केला. हा ट्रक पंजाब येथील असल्याचे निष्पन्न झाले. पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षख सोपान पाटील आणि त्यांच्या पथकाने पंजाब येथे जाऊन ट्रकचलाक आरोपी सूरजित सिंग (५९) याला अटक केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे आदींच्या पथकाने कारवाई करून या 'हिट एण्ड रन' च्या आरोपीला अटक करण्यात यश मिळवले.

CamScanner

दैनिक
आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : ११ | अंक. १८ | रविवार २१ एप्रिल २०२४ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०४

# नालासोपारा येथून देशी बनावटीच्या रिव्हॉल्व्हरसह एकाला अटक

**वसई.** देशी बनावटीचे रिव्हॉल्व्हर बाळगणाऱ्या आरोपीला जेरबंद करण्यात पेल्हार पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला यश आले आहे. त्याच्याविरुद्ध पेल्हार पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

पोलिसांनी सांगितले की, १८ एप्रिल रोजी रात्री १७.३० वाजण्याच्या सुमारास पेल्हार पोलिसांना गुप्त खबरदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, जबरपाडा, पेल्हार गाव, नालासोपारा पूर्व येथे एक व्यक्ती दाखल झाली आहे. .गुन्हे तपास पथकाचे एपीआय सोपान पाटील यांनी याबाबतची माहिती पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना दिली होती. वरील आदेशानुसार एपीआय सोपान पाटील, पीएसआय तुकाराम भोपले व पथकाने सापळा रचून नालासोपारा पूर्व येथील इरफान अजवर खान याला अवैध शस्त्र बाळगल्याच्या आरोपावरून ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३५ हजार रुपये किमतीचे रिव्हॉल्व्हर सापडले. मात्र, पेल्हार पोलिसांनी भारतीय शस्त्रास्त्र कायदा ३७ (१) (३), १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकमत

# महिला प्रवाशाच्या चेहऱ्यावर पेल्हार पोलिसांनी फुलवले हसू

## रिक्षात गहाळ झालेला लाखांचा मुद्देमाल मिळवून दिला परत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : रिक्षात प्रवासात गहाळ झालेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा लाखोंचा मुद्देमाल परत मिळवून देण्यात पेल्हारच्या पोलिसांना यश मिळाले आहे. गहाळ झालेला मुद्देमाल परत मिळाल्याने महिला प्रवाशाच्या चेहऱ्यावर हसू फुलले होते.

धानिवबाग येथे राहणाऱ्या नाजली अन्सारी (२४) या १७ एप्रिलला दुपारी नालासोपारा रेल्वेस्थानक येथे जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यांनी रिक्षा पकडली. रिक्षा प्रवासादरम्यान बॅग रिक्षात विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्या बॅगमध्ये १ तोळे सोन्याची चेन, २ ग्रॅमचे झुमके, ५ हजार रोख असे १ लाख ५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल गहाळ झाल्याचे लक्षात आले. त्यांनी पेल्हार पोलिसांना माहिती देऊन तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी अनोळखी रिक्षा व चालकाचा शोध घेण्यासाठी पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी गुन्हे प्रकटीकरणातील पोलिस अधिकारी, अंमलदारांना सूचना व आदेश दिला.



### सीसीटीव्हीची मदत

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता एका रिक्षामधून नाजली अन्सारी या उतरताना दिसल्या. त्या रिक्षाच्या सीसीटीव्हीच्या आधारे शोध घेतल्यावर ती रिक्षा सोपारा फाटा ते नालासोपारा रेल्वेस्थानक अशी प्रवासी वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली. रिक्षाचा शोध घेतल्यावर चालकाला बॅगबाबत विचारणा केल्यावर मौल्यवान वस्तू असलेली बॅग त्याने पोलिसांना आणून दिली. पेल्हार पोलिसांनी ऐवजासहित बॅग नाजली यांना परत केली.

### यांनी केली कामगिरी

ही कामगिरी पोलिस उपायुक्त जयंत भजबळे, सहायक पोलिस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलिस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, पोलिस निरीक्षक (प्रशासक) शकील शेख, गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि सोपान पाटील, पोलिस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, पोलिस हवालदार योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मीक पाटील, रवी वानखेडे, किरण आव्हाड, मिथुन मोहित आदींनी केली आहे.

Hello Vasai
Page No. 4 Apr 21, 2024
Powered by: erelego.com

CamScanner